MHRG190000752023

:: <u>विशेष दिवाणी दावा क्र.३९/२०२३ मधील निशाणी क्रमांक १५६ खालील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.४ यांनी 'विना कैफियत' आदेश रद्द करणेबाबत विनंती केली.

०२. अर्ज व वादीने दिलेले म्हणणे वाचले. प्रतिवादी क्र.४ चे वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

०३. प्रतिवादी क्र.४ चे कथन की, प्रतिवादी क्र.४ हे परदेशी असल्यामुळे तसेच प्रतिवादी क्र.४ ची आई मयत झाल्यामुळे प्रतिवादी न्यायालयात हजर राहु शकला नाही, त्यामुळे दिनांक १६.११.२०२५ रोजी 'विना कैफियत' आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादीची कैफियत दाखल न झाल्यास प्रतिवादीचे फार मोठे नुकसान होईल याउलटत प्रतिवादीची कैफियत दाखल झाल्यास दाव्याचा निर्णय सोपा व सोईस्कर होईल. सबब, प्रतिवादी क्र.४ विरुध्द 'विना कैफियत' दावा चालविण्याचा झालेला आदेश रद्द होऊन कैफियत अभिलेखावर घेण्याबाबत विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्जास विरोध करताना वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादीने न्यायालयात हजर होऊनही जाणुनबुजुन मुदतीत कैफियत दाखल केलेली

नाही. प्रस्तुतचा दावा सद्यस्थितीत अंतिम युक्तीवादासाठी नेमलेला आहे. प्रतिवादीच्या खरेदीखताचे फेरफार महसुली अधिका–यांनी रद्द केलेले आहे. महसुल न्यायालयात सदरहु प्रतिवादी हजर होते. दाव्याचे काम प्रलंबित ठेवण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे संयुक्तिक कारण नमुद केलेले नाही. मोघम कारणांचे आधारे सदरचा अर्ज दिला असल्याने फेटाळण्याची विनंती केली आहे.

०५. अर्ज, अर्जाला दिलेले म्हणणे व परस्पर विरोधी युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा दावा ठरावाकरिता, सरसनिरस व तुटक वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादीस समन्स प्राप्त होऊनही मुदतीत कैफियत सादर केली नसल्यामुळे माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र.१ वर दिनांक १६.११.२०१९ रोजी विना कैफियत आदेश पारीत केला. प्रतिवादीने कैफियत देण्यासाठी तसेच विना कैफियत आदेश रद्द करण्याचा अर्ज देण्यास विलंब केलेला आहे. परंतु प्रतिवादीने त्यांच्या अर्जामध्ये दिलेली कारणे संयुक्तीक आहेत. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादीस बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. प्रतिवादीविरुध्द दिनांक १६.११.२०१९ रोजीचा झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होवून उभय पक्षातील वादाला पुर्णविराम मिळेल. परंतु प्रतिवादींनी म्हणणे दाखल करण्यास जवळपास सहा वर्षाचा विलंब केल्याने वादीनादेखील प्रतिवादींच्या कृत्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागल्याने प्रतिवादींवर खर्चाची रक्कम बसवणे उचित वाटते. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

दिनांक ०७.०१.२०२६

## :: आदेश ::

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.४ विरुध्द दिनांक १६.११.२०१९ रोजी पारित झालेला विना कैफियत आदेश कॉस्ट रक्कम रु.५०००/- आकारुन रद्द करण्यात येतो व म्हणणे दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.07 12:39:11 +0530

महाड

दिनांकः०७.०१.२०२६

**(श्रीमती एच. आर. जाधव)**

दिवाणी न्यायाधीश व.स्तर, महाड

दिनांक ०७.०१.२०२६